# देवाच्या लोकांना संघटित करा म्हणजे सर्वांना इथ्रोसारखी सेवा करता येईल

देखभाल करणाया इतर वडीलजनांबरोबर जबाबदाया वाटून घ्या.

मुलांना शिकवणायांनी L1b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, इथ्रोने मोशेला सल्ला मार्गदर्शन दिले त्याप्रमाणे संयोजन करण्यास आमचे साहाय्य कर.'' सध्याच्या गरजा आणि स्थानिक रुढीपरंपरा ह्यांना अनुरूप असे कार्यक्रम निवडा.

## 1. देवाच्या वचनाच्याद्वारे आपल्या अंत:करणाची व मनाची तयारी करा.

पाहा निर्गम 18 मध्ये इस्राएल लोकांमध्ये गट सुरु करण्यासाठी देवाने इथ्रोचा कसा उपयोग करुन घेतला. इथ्रो माशेचा मार्गदर्शक होता.

- मोशेची इथ्रोशी कशी भेट झाली ते निर्गम अध्याय 1-3 मध्ये दिले आहे. ते तुम्ही वाचले नसेल तर कृपा करुन वाचा.
- प्रत्येक इस्राएली कुटुंबाला आध्यात्मिक मेंढपाळाचे मार्गदर्शन मिळत आहे, याची खात्री मोशेने कशी करुन घेतली?
- त्यांच्या लहानात लहान गटांमध्ये किती लोक असावेत अशी सूचना इथ्रोने केली?
- देवाने ह्या नव्या पुढायांना मुख्य नियम लावून दिले. त्यांच्या आधारे त्याच्या लोकांची त्यांनी व्यवस्था लावायची होती (निर्गम अध्याय 19 व 20)
- हे नियम म्हणजे देव आणि इस्राएल यांच्यामधील दहा आज्ञांवर आधारलेला करार होता.
- हे नियम म्हणजे देवाने इस्राएलाला दिलेल्या प्राचीन नियमशास्त्राचा गाभा होता. यालाच यहूदी लोक 'तोरा' असे म्हणत.
- लोकांची पाळकीय देखभाल करण्यासाठी दहाजणांचे लहान-लहान गट केले होते.
- पाळक मेंढपाळाने सर्वांची योग्य काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी त्याला दहाहून अधिक कुटुंबे देखभालीकरीता दिली नव्हती. दहापेक्षा अधिक कुटुंबांचे म्हणणे ऐकून घेणे अवघड आहे.
- मोठया गटांचे पुढारी न्याय व शासन व्यवस्थेचा समन्वय साधतात.

समतोल नेतृत्वामध्ये **चार कर्तव्ये** एकत्र केलेली आहेत. त्यासाठीचे पवित्र शास्त्रातील आदर्श पुढील प्रमाणे. उत्तम संयोजक ह्या चार बलस्थानांचा समतोल राखतात. बरेचदा, ह्या गोष्टी पुढायांच्या गटामध्ये एकत्रित केल्या जातात.

1. मोशे द्रष्टा होता, त्याने भविष्यात डोकावले आणि देव काय करणार आहे त्याचा दृष्टांत आपल्या अनुयायांना सांगून प्रेरणा दिली.

दृष्टी



करण्याकरीता पाळकांना साहाय्य करतात. लोकांचा विरोध होत असतानाही, देव त्याची सेवा करीत राहण्याचे धैर्य काही संयोजकांना देतो. ते सेवकांना चिकाटीने काम करण्यास उत्तेजन देतात.

2. यहोशवा, लढवय्या होता. त्याने मोशेचे स्वप्न प्रत्यक्षात आणले. त्याने कधी कधी सैन्याच्या बळाचा वापर केला.


दृढता



देव काही संयोजकांना सेवाकार्याच्या तपशीलाची अचूक व्यवस्था ठेवण्याचे कौशल्य देतो. त्यामुळे इतर सेवकांचे काम सोपे होते.

3. अहरोन, व्यवस्थापक, मुख्य याजक होता आणि इतर याजक दैनिक याजकीय कामकाज व्यवस्थित पार पाडत आहेत याकडे लक्ष देत असे.


पारंगत असणे



देव काही संयोजकांना सेवाकार्याच्या तपशीलाची अचूक व्यवस्था ठेवण्याचे कौशल्य देतो. त्यामुळे इतर सेवकांचे काम सोपे होते.

4. बर्णबा, प्रोत्साहन देणारा होता, आस्थेवाईक होता. तो लोकांना एकदिलाने काम करण्यास मदत करतो. करीत असे.

दयाळूपणा



देव त्याचे कार्य समाज प्रिय असावे यासाठी काही संयोजकांना मदत ते लोकांची खात्री पटवतात, त्याचे समाधान करतात तसेच लोकांच्या गरजा पूर्ण करण्याकरीता काम करणे त्यांना आवडते.

उत्तम संयोजक ह्या चार बलस्थानांचा समतोल राखतात. बरेचदा, ह्या पुढ्रायांच्या गटामध्ये एकत्रित केल्या जाते.

- वरील चार बलस्थानांपैकी कोणत्या गोष्टीने तुम्ही चांगले संयोजन कराल? कशासाठी तुम्हांला मदतीची गरज आहे?
- एक उत्तम संयोजक आध्यात्मिक कृपादाने असलेल्या सहाय्यकांना सोबत घेऊन काम करतो, ही कृपादाने त्याच्याकडे नसतात.
- येशू दावीद व पौल ह्यांच्या ठायी समन्वयकाचे हे चारही पैलू होते, पण प्रत्येकाच्या ठायी हे पैलू अभावानेच एकत्र पहायला मिळतात.

उत्तम संयोजक **नेतृत्वाच्या जबाबदाृया वाटून घेतात.**येशू, दावीद व पौल ह्यांनी एकेकटयाने काम केले नाही.

**पुढाकार** नवीन मंडळया आणि नवे प्रकल्प सुरु करतात किंवा ते नवीन भागात देवाचे कार्य सुरु करतात.

- दूरदृष्टीचा पुढारी देव काय करणार आहे हे आपल्या अंत:करणात पाहतो आणि इतरांना हे स्वप्न-दृष्टांत सांगतो.
- ते बहुधा शांतपणे इतर पुढ्रायांना मार्गदर्शन करतात, जसे अहरोन मोशेचा प्रवक्ता म्हणून काम करीत असे.
- प्रेषितांची कृत्ये ह्या पुस्तकात नव्या मंडळयांचे संयोजन करणारे पेत्र व इतर हे पुढाकार घेणारे होते.
- मोशे सारख्या दृष्टांत पाहिलेल्या नेत्याला लोकांनी काय करावे अशी देवाची इच्छा आहे हे स्पष्टपणे ठाऊक होते. असा दूरदर्शीपणा नसणाृया पाळकांना पुढारीपण करता येत नाही कारण कोणत्या दिशेने जायचे हेच त्यांना माहित नसते. शिक्षण दिल्याने संयोजन होत नाही किंवा नेतृत्व होत नही. शिकवल्याने फक्त नियम गळी उतरवले जातात त्याचा उपयोग शून्य असतो.

पुढाकार घेणाृयांनी पुढे होऊन सुरु केलेले संस्थांमधील काम **व्यवस्थापक** पुढे नेतात.

- पौलाने क्रेत येथे नवीन मंडळी सुरु केली. तिच्या पाळकांना शिक्षण देऊन तयार करण्यासाठी तीत तेथे जाऊन. राहिला (तीत. 1:5).
- उत्तम व्यस्थापक देवाच्या इच्छेप्रमाणे मंडळीचे संघटन करतात. आम्ही, प्रार्थना करा, दान द्या, मार्गदर्शन करा, शिकवा, गरजूंची सेवा करा, सहभागिता वाढवा, कुटुंबे बळकट करा, सेवा करण्यासाठी संयोजन करा, सद्‌गुणांचा विकास करा, उपासना करा, नवीन मंडळया सुरु करा, पुढ्रायांना प्रशिक्षण द्या आणि मिशनरी पाठवा, याविषयी सांगितले पाहिजे.

तुम्ही कोण आहात, पुढाकार घेणारे की व्यवस्थापक? (फारच थोडे संयोजक दोन्ही गोष्टी दीर्घकाळ उत्तम प्रकारे पार पाडतात)

पाळकीय देखभाल करण्याची क्षमता असणाऱ्या विश्वासणाऱ्यांची भेट घेऊन त्यांना सुरुवात करण्यासाठी साहाय्य करा. कोणा पुढाऱ्यांना योग्य प्रकारे संयोजनाविषयी अधिक शिकण्याची गरज असेल तर ह्या अभ्यासक्रमाची त्यांच्याबरोबर उजळणी करा.

**2. तुमच्या सहकाऱ्यांना घेऊन आठवडयातील कार्यक्रम ठरवा.**

तुमच्या सकाऱ्यांची भेट घ्या. इथ्रोने मोशेला सांगितले त्याप्रमाणे त्यांना संयोजन करण्यास मदत करा.

वाईट संयोजन आणि उत्तम संयोजन यांची तुलना करण्यासाठी 'लांडग्यांचा' खेळ खेळा (हे उपासनेच्या दरम्यान करु नका).

- दहा किंवा अधिक जणांना मेंढरे म्हणून खेळण्यास सांगा. त्यांनी हालचाल न करता एका ओळीत उभे राहायचे.
  - तिघांना लांडगे तर एकाला मेंढपाळ करा. त्यांना हालचाल करता येईल.
  - तुम्ही 'जा' असे म्हटले की लांडगे मेंढरे पकडण्याचा प्रयत्न करतील. समजा, लांडग्याने मेंढराला स्पर्श केला की ते खाली पडेल.
  - समजा मेंढपाळाने लांडग्याला स्पर्श केला तर लांडगा खाली पडेल, बरीच मेंढरे 'मेल्यावर' खेळ थांबवा.
- मेंढपाळ पाळकाने आपल्या लोकांचे लहान लहान गट करुन प्रत्येक गटावर एक नवा मेंढपाळ नेमा.
- आता पुन्हा म्हणा ''जा!'' आणि लांडगे मेले की खेळ थांबवा.
- विश्वासणाऱ्यांना विचारा. ''अधिक मोलवान् काय आहे मेंढरु की मनुष्याचा आत्मा?''
- लहान गटांवर मेंढपाळ पाळकांची नेमणूक कर असे इथ्रोने मोशेला का सांगितले? हे विचारा.
- विचारा : ''अनेक मेंढपाळ पाळक विश्वासणाऱ्यांच्या अनेक लहान लहान मंडळयांचे नेतृत्व करतात किंवा एकच पाळक भल्या मोठया मंडळीचे एकटयाने नेतृत्व करतो यातील सर्वोत्तम काय आहे?''

  आम्ही लहान लहान गट करावेत अशी देवाची इच्छा का आहे यावर चर्चा करा.

**3. येणाऱ्या उपासने विषयी सहकाऱ्यांबरोबर योजना आखा.**

इथ्रोने मोशेला त्याच्या लोकांचे संघटन कशा प्रकारे करण्यास सांगितले ते सांगा किंवा नाट्यीकरण करा. भाग 1 मधील प्रश्न विचारा. पुढाऱ्यांची चार कर्तव्ये भाग 1 मधून स्पष्ट करा (दृष्टी, दृढता, पारंगत असणे आणि दयाळूपणा). विश्वासणाऱ्यांनी त्यांना लहान गटांकडून मिळालेल्या मदती विषयी सांगावे. लहान गटांमध्ये प्रत्येकाची गरज पाहिली जाते.

मुलांनी तयार केलेली नाटिका व इतर गोष्टी सादर कराव्यात. देवाच्या कार्यातील पुढाकार घेणारे व व्यवस्थापक अशा दोघांची गरज स्पष्ट करा. 1 पेत्र 5:2-3 मधून पाळकांठीचे देवाचे नियम एकत्रितपणे **पाठ करा.** दोन वा तीन जणांचे गट करुन बसा आणि एकमेकांसाठी प्रार्थना करुन प्रोत्साहन द्या, तसेच योजना आखा.

**प्रभुभोजनापूर्वी,** येशूने पाच हजारांना कशा प्रकारे भोजन दिले ते सांगा (लूक 9:12-17). प्रत्येकाला जेवण मिळावे याकरीता त्यांचे 50-50 चे गट केले. आपल्यालाही अशाच प्रकारे लहान गटात प्रभुभोजन घेता येईल, यामुळे सर्व विश्वासणाऱ्यांना येशूचे शरीर व रक्त यामध्ये 'सहभागी' होता येईल (1 करिंथ 10:16-17).

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net